MHRG070006852026

**<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र.७६/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार **श्रीमती. अंजू नामदेव पारधी**, राहणार – टपालवाडी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचे सायबर क्राईम पोर्टल तक्रार क्र.३११९०१२६०००८६४३ मधील बँक ऑफ इंडिया, शाखा–नेरळ, खाते क्र.१२५३१०११०००४३१० मधील रक्कम रुपये ६९,६७४.७६/– इतके कट झाले असून त्यातील अशी एकुण रक्कम रुपये २७,०२०.२३/– (अक्षरी रक्कम सत्तावीस हजार वीस रुपये तेवीस पैसे मात्र) होल्ड करण्यात आलेली आहे. तरी अर्जदार यांनी होल्ड केलेली रक्कम परत मिळणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांना दिनांक १२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.४३ चे सुमारास ७०८०३३८१०४ या अनोळखी मोबाईल नंबर कॉल आला व कॉल करणा–या व्यक्तीने अर्जदारास सांगितले की, तुमच्या वडीलांच्या एल. आय. सी. पॉलिसीचे रक्कम रु.१२,५००/– आले आहेत. ते पैसे त्यांच्या अकाउंटला ट्रान्सफर होत नाहीत, तुमच्या अकाउंटला ट्रान्सफर करु का ? तर अर्जदाराने त्यांस होकार दिला. व त्यांनी त्यानंतर अर्जदाराचे खात्यात रक्कम रुपये १०,०००/– पाठविलेबाबतचा अर्जदाराचे मोबाईलवर टेक्ट मेसेज आला. त्यानंतर पुन्हा त्यांनी अर्जदाराचे खात्यात रक्कम रुपये २५,०००/– पाठविलेबाबतचा अर्जदाराचे मोबाईलवर टेक्स मेसेज आला. त्यानंतर त्यांचा

अर्जदारास कॉल आला व त्यांनी अर्जदारास सांगितले की, "तुमचे खात्यात रक्कम रुपये २,५०० पाठविण्याऐवजी चुकून एक शून्य जास्त झाल्याने रक्कम रुपये २५,०००/– पाठविले गेले आहेत. त्यामुळे तुम्ही त्वरीत मला रक्कम रुपये १०,०००/– परत पाठवा ". व अर्जदाराने कोणतीही शहानिशा करता तिचे खात्यातून रक्कम रुपये १०,०००/– परत पाठविले. व त्यानंतर त्वरीत अर्जदार हिच्या खात्यातून धडाधड पैसे कट होत गेले. त्यामुळे अर्जदार हिने त्याबाबत नेरळ पोलीस स्टेशनला जावून सायबर पोलीसांकडे तक्रार नोंदविली. सदर गुन्ह्याअंतर्गत अर्जदार हिचे खात्यातून रक्कम रुपये ६९,६७४.७६ /– कट झाली असून त्यापैकी पोलीसांनी रक्कम रुपये २७,०२०.२३/– धारण केली आहे. सदर रक्कम अर्जदार यांच्या मालकीची असून ती अर्जदार व तिच्या उदरनिर्वाहाकरीता व घरखर्चकरीता अत्यंत आवश्यक आहे. तसेच सदर रक्कम अर्जदारास न मिळाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल. सबब, नेरळ पोलीस स्टेशन सायबर पोलीस तक्रार पोहोच पावती क्रं.३१९०१२६०००८६४३ या गुन्हात पोलीसांनी धारण केलेली वर नमूद रक्कम अर्जदार यांना देणेबाबत आवश्यक तो हुकूम व्हावा, ही विनंती.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार, कर्जत पोलीस स्टेशन यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे म्हणणे दाखल केले आहे की, सदर प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा अर्जदार यांचे मालकीचा असलेबाबतचा पुरावा दाखल आहे. सदरचा मुद्देमाल हा महत्वाचा पुरावा आहे. सदरची रक्कम ही अर्जदारास परत केल्यास ती खर्च करण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा गुन्हा शाबीतीसाठी अडथळा निर्माण होईल. सबब, सदर अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार, नेरळ यांनी असे

म्हणणे दाखल केले आहे की, वरीलप्रमाणे अर्जदार यांनी दिलेल्या ऑनलाईन तक्रारीमध्ये फसवणूक झालेल्या ६९,६७४.७६ रुपये रक्कमेपैकी २७,०२०.३०/– रुपये रक्कम गोठविण्यात आलेली आहे. लाभार्थी यांच्या खालील नमूद बॅक खात्यांमध्ये जमा झालेली असून सदरची रक्कम पुढील तपशीलाप्रमाणे गोठविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं | बॅकेचे नाव | खाते नंबर | गोठविण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | युसीओ बॅक | ११६८०११००५९२०३ | १३.६०/– |
| २ | कोटक महिंद्र बँक | ६०५२१९९७४७ | १०,०००/– |
| ३ | मोबीक्वीक | ९१७०२००५६८७१२५१ | १,१८०/– |
| ४ | पंजाब नॅशनल बँक | ११८२०००१०९०८६३२१ | ३,०००/– |
| ५ | पंजाब नॅशनल बँक | ०७१९२००१००००४६३१ | ७१.०६/– |
| ६ | ऐअरटेल पेमेट बँक | ७६७९९८३१६४ | ४५२.५५/– |
| ७ | बंधन बँक | ५०२३०००९६६२८६४ | ११४.२७/– |
| ८ | ऐअरटेल पेमेट बँक | ९९३१२५६३६२ | ४३०.२९/– |
| ९ | बंधन बँक | २०२००१३१४६००६२ | १,२७१.४६/– |
| १० | स्टेट बँक ऑफ इंडिया | ४४३७२८७७९२३ | १०,४८७/– |
| | एकूण रक्कम | | २७,०२०.२३/– |

अर्जदार यांची गोठविण्यात आलेली रक्कम ही योग्य त्या अटी व शर्थीवर परत देणेस त्यांची काही एक हरकत नाही.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांचे आधारकार्डाची व्हेरीफाईट प्रत, अर्जदार यांनी नेरळ पोलीस स्टेशन सायबर पोलीस यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीची सहीशिक्काची प्रत, अर्जदार हिचे बँक पासबुकची व्हेरीफाईट प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०५. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | सायबर क्राईम पोर्टल तक्रार क्र. ३११९०१२६०००८६४३ बँक ऑफ इंडिया, शाखा– नेरळ, खाते क्र.१२५३१०११०००४३१० मधून वळती झालेली एकुण रक्कम रुपये २७,०२०.२३/– (अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस हजार वीस रुपये तेवीस पैसे मात्र) ही रक्कम अर्जदार **श्रीमती. अंजू नामदेव पारधी,** यांना रक्कम रुपये २७,०२०.२३/– (अक्षरी रक्कम रूपये सत्तावीस हजार वीस रुपये तेवीस पैसे मात्र) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावी. सदरची रक्कम अर्जदार यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. |
| ३. | जप्त रक्कम ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास अर्जदार यांनी सदरची रक्कम परत करावी. |
| ४. | अर्जदाराने सदर रक्कम ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत नेरळ पोलीस स्टेशन व सायबर क्राईम विभाग यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.06.24 17:51:33 +0530

कर्जत. (श्रीमती ए. एस. वाडकर)
दिनांक : २४/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड